12.03.2020 **प्रभात:मुरली**
**ओम शांती**
**बापदादा** **मधुबन**

**''गोड मुलांनो,तुम्ही बाबांचा हात पकडला आहे,तुम्हाला ग्रहस्थ व्यवहारांमध्ये राहत बाबांची आठवण करत करत तमोप्रधान पासून सतोप्रधान बनाल''**

**प्रश्नः-** तुम्हा मुलांच्या मध्ये कोणता उल्हास,आनंद राहायला पाहिजे? सिंहासनधारी बनण्याची विधी काय आहे?

**उत्तरः-** नेहमी उल्हास राहावा की, ज्ञानाचे सागर बाबा आम्हाला रोज ज्ञान रत्नाच्या थाळ्या भर-भरून देत आहेत. जितके आठवणीमध्ये रहाल तेवढी बुद्धी कंचन,सोन्या सारखी बनेल.हे अविनाश ज्ञान रत्नच सोबत जातात.सिंहासनधारी बनायचे आहे तर,मातपित्याचे पूर्णपणे अनुकरण करा.त्यांच्या श्रीमता नुसार चाला,दुसऱ्यांना पण आपल्या सारखे बनवा.

**ओम शांती।** आत्मिक मुलं या वेळेत कोठे बसले आहेत?आत्मिक पित्याच्या विद्यापीठा मध्ये किंवा शाळेमध्ये बसले आहेत.बुद्धीमध्ये आहे आम्ही आत्मिक पित्याच्या सन्मुख बसलो आहोत,ते पिता आम्हाला सृष्टीच्या आदी मध्य अंतचे रहस्य समजावत आहेत किंवा भारताची प्रगती आणि अधोगती कशी होते,हे सांगत आहेत.भारत जो पावन होता तो आत्ता पतित आहे.भारतच शिरोमणी होता परत कोणी जिंकला? रावणाने.राजाई गमावली तर अधोगती झाली ना.कोणी राजा तर नाही.जर असतील तर ते पण पतित च असतील. याच भारतामध्ये सूर्यवंशी महाराजा महाराणी होते.सूर्यवंशी महाराजे आणि चंद्रवंशी राजे होते.या गोष्टी आता तुमच्या बुद्धी मध्ये आहेत,दुनिये मध्ये या गोष्टी कोणीच जाणत नाहीत.तुम्ही मुलं जाणता आमचे आत्मिक पिता आम्हाला शिकवत आहेत.आत्मिक पित्याचा आम्ही हात पकडला आहे. जरी आम्ही गृहस्थ व्यवहारांमध्ये राहतो परंतु बुद्धीमध्ये आहे की आता आम्ही संगम युगामध्ये आहोत.पतित दुनिये पासुन पावन दुनिये मध्ये जात आहोत. कलियुग पतित युग आणि सतयुग पावन दुनिया आहे.पतित मनुष्य पावन मनुष्याच्या पुढे जाऊन नमस्ते करतात. ते पण भारताचेच मनुष्य आहेत परंतु त्यांच्यामध्ये दैवी गुणधारी आहेत.आता तुम्ही मुलं जाणता आम्ही बाबा द्वारे दैवी गुण धारण करत आहोत.सतयुगा मध्ये हा पुरुषार्थ करत नाहीत.तेथे तर प्रारब्ध म्हणजे भाग्य आहे.येथेच पुरुषार्थ करून दैवीगुण धारण करायचे आहेत. नेहमी स्वतःला तपासायचे आहे आम्ही बाबाची किती आठवण करतो,त्यामुळे तमोप्रधान पासुन सतोप्रधान बनत आहोत. जितकी बाबांची आठवण कराल तेवढे सतोप्रधान बनाल.बाबा तर नेहमी सतोप्रधान च आहेत.आता तर पतीत दुनिया पतीत भारत आहे.पावन दुनियेमध्ये पावन भारत होता.तुमच्या जवळ प्रदर्शनी मध्ये वेगवेगळ्या प्रकारचे मनुष्य येतात.कोणी म्हणतात जसे भोजन जरुरी आहे,तसेच विकार पण भोजन आहे,यांच्या शिवाय मरून जाऊ. आता अशा गोष्टी तर नाहीत.संन्यासी पवित्र बनतात मग ते काय मरतात का? असे बोलणाऱ्या साठी समजायला पाहिजे हे खूपच अजामिल सारखे पापी आहेत,जे असे बोलतात.बोलायला पाहिजे,काय विकारा शिवाय तुम्ही मरुन जाल,जे याची तुलना विकाराशी करतात.स्वर्गा मध्ये येणारे जे असतील,ते सतोप्रधान असतात. त्यानंतर सतो रजो तमो मध्ये येतात ना. जे शेवटी येतात त्यांनी निर्विकारी दुनिया तर पाहिलीच नाही,तर ते असे म्हणतील की विकारा शिवाय राहू शकत नाहीत.जे सूर्यवंशी असतील त्यांच्या बुद्धीमध्ये लगेच येईल, ही तर सत्य गोष्ट आहे.बरोबर स्वर्गामध्ये विकाराचे नाव रूप नव्हते.वेगवेगळ्या प्रकारचे मनुष्य वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी करतात. तुम्ही समजतात कोण कोण फूल बनणारे आहेत?कोणी तर काटेच राहतात.स्वर्गाचे नावच आहे फुलांची बाग. हे आहे काट्याचे जंगल.काटे पण अनेक प्रकारच्या असतात ना.आता तुम्ही जाणतात,आम्ही फूल बनत आहोत.बरोबर हे लक्ष्मीनारायण नेहमी गुलाबाचे फुल आहेत.यांना फुलांचा राजा म्हणाल.जे दैवी फुलांचे राज्य असते ना.जरूर त्यांनी पुरुषार्थ केला असेल.राजयोग अभ्यासाच्या द्वारे बनले आहेत.

तुम्ही जाणता,आत्ता आम्ही ईश्वरीय परिवाराचे बनलो आहोत.प्रथम तर ईश्वराला जाणतच नव्हतो.बाबांनी येऊन हा परिवार बनवला आहे. पिता प्रथम स्त्रीला दत्तक घेतात,परत त्यांच्याद्वारे मुलं होतात.बाबांनी पण यांना दत्तक घेतले आहे परत यांच्याद्वारे मुलांची रचना केली.हे सर्व ब्रह्मकुमार कुमारी आहेत ना.हे नाते प्रवृत्ती मार्गाचे होते.

संन्याशाचा निवृत्तीमार्ग आहे. त्यांच्यामध्ये कोणाला मम्मा बाबा म्हणत नाहीत.येथेच मम्मा बाबा म्हणतात.दुसरे जे पण सत्संग आहेत,ते सर्व निवृत्ती मार्गाचे आहेत. हे एकच पिता आहेत त्यांनाच मात पिता म्हणून बोलतात. बाबा सन्मुख समजवतात,भारतामध्ये पवित्र प्रवृती मार्ग होता,आता अपवित्र बनला आहे.मी परत त्याच प्रवृत्ती मार्गाची स्थापना करतो.तुम्ही जाणता आमचा धर्म खूपच सुख देणारा होता, परत आम्ही जुन्या धर्म वाल्या सोबत का करायची?तुम्ही स्वर्गामध्ये खूप सुखी होते,हिरे मोत्याचे महल होते.येथे जरी अमेरिका,रशिया इत्यादी मध्ये खूप सावकार आहेत परंतु स्वर्गा सारखे सुख होऊ शकत नाही.सोन्याच्या विटांचे महल तर कोणी बनवू शकत नाहीत.सतयगा मध्येच सोन्याचे महल असतात.येथे सोने आहे कोठे.तेथे तर प्रत्येक जागी हिरे मोती लागलेले असतील.येथे तर हिऱ्यांची किंमत तर खूप झाली आहे.हे सर्व मातीत मिसळून जाईल.बाबांनी समजवले आहे,नवीन दुनिया मध्ये सर्व नवीन खाणी भरपूर होतील.आता या सर्व खाणी खाली झाल्या आहेत.असे दाखवतात सागरा ने हिऱ्या मोत्याच्या थाळ्या भेट केल्या. हिरे-मोती तर तुम्हाला तेथे खूप मिळतील.सागराला पण देवता च्या रूपात समजतात.तुम्ही समजता बाबाच ज्ञानाचे सागर आहेत.नेहमी च उल्हास राहावा की ज्ञानाचे सागर बाबा,आम्हाला रोज ज्ञान रत्ना च्या थाळ्या भर भरून देत आहेत.बाकी तो तर पाण्याचा सागर आहे.बाबा तुम्हा मुलांना ज्ञान रत्न देतात,जे तुम्ही बुद्धीमध्ये भरतात. जितके योगामध्ये राहाल तेवढी बुद्धी कंचन होत जाईल.हे अविनाशी ज्ञान रत्नच सोबत घेऊन जातात.बाबाची आठवण आणि हे ज्ञान मुख्य आहे.

तुम्हा मुलांना मनामध्ये खूप आनंद राहायला पाहिजे.बाबा पण गुप्त आहेत. तुम्ही पण गुप्त सेना आहात.अहिंसक गुप्त योद्धे म्हटले जाते ना.अमका खूपच मोठा योद्धा आहे परंतु नाव रुपाची माहिती नाही,असे तर होऊ शकत नाही. शासना जवळ एका एकाचे नाव रूप पूर्ण असते तुमचे नाव आहे सर्वात प्रथम हिंसा हे काम विकास यादीमध्ये दुःख देतात म्हणून म्हणतात हे पतितपावन पती त्यांना पावन बनवा आहे गुप्त योग्य म्हटलं जातं मका खूपच पहिलवान योद्धा आहे परंतु नाव रूप तर माहित नाही असे होऊ शकत नाही शासनाजवळ पण एका एका एकाचे नाव रुप असते.गुप्त योद्धे हे तुमचे नाव आहे.सर्वात प्रथम हिंसा काम विकारांमध्ये जाणे,ही आहे,जे आदी मध्य अंत दुःख देतात,म्हणून असे म्हणतात ते पतित-पावन आम्हाला येऊन पावन बनवा.पावन दुनिये मध्ये एक पण पतित होऊ शकत नाही.हे तुम्ही मुलं जाणता,आता आम्ही भगवंताची मुल आहोत,बाबा कडून वारसा घेत आहोत परंतु माया पण कमी नाही.अशी चापट लावते,जे काम विकार रूपी गटर मध्ये म्हणजे विकारांमध्ये पाडते,त्यांची बुद्धी एकदम भ्रष्ट होते. बाबा खूप समजवतात आपसा मध्ये एक दोघांशी सोबत प्रेम ठेवू नका. तुम्हाला तर एक बाबाशी स्नेह ठेवायचा आहे,कोणत्याही देह धारीशी प्रेम करू नका.प्रेम ठेवायचे आहे त्यांच्याशी,जे देह रहित विचित्र पिता आहेत.बाबा खूपच समजावत राहतात तरीही समजत नाहीत.भाग्या मध्ये नाहीतर एक दोघांच्या देहामध्ये फसतात.बाबा खूप समजवतात,तुम्हीही रुप आहात. आत्मा आणि परमात्म्याचे रूप तर एकच आहे.आत्मा लहान-मोठी होत नाही,आत्मा अविनाशी आहे.प्रत्येकाची नाटका मध्ये भूमिका नोंदलेली आहे. आता तर खूप मनुष्य आहेत परत नऊ दहा लाखच राहतील.सतयुगा मध्ये खूपच छोटे झाड असते.प्रलय तर कधी होत नाही.तुम्ही जाणता जे पण मनुष्यमात्र आहेत त्या सर्वांचे आत्मे मूळ वतन मध्ये राहतात.त्यांचे पण झाड आहे.बीज पेरले जाते त्याद्वारे झाड निघते,प्रथम दोन पाने निघतात. हे पण बेहदचे झाड आहे.सृष्टिचक्रा च्या गोळ्या वरती समजावणे खूपच सहज आहे. विचार करा प्रथम हे नव्हते,परत कोठे जातील.सर्व आत्मे परमधाम मध्ये चालले जातात.तुमच्या बुद्धीमध्ये सर्व ज्ञान आहे,जसे बाबा ज्ञानाचे सागर आहेत,तसेच तुम्हाला बनवतात.तुम्ही शिकुन हे पद प्राप्त करता.बाबा स्वर्गा चे रचनाकार आहेत, तर स्वर्गाचा वारसा भारत वासीयांनाच देतील,बाकी सर्वांना परत घेऊन जातील.बाबा म्हणतात मी आलो आहे, मुलांना शिकवण्यासाठी. जितका पुरुषार्थ कराल तेवढे पद मिळेल.जितके श्रीमता वरती चालाल तेवढे श्रेष्ठ बनाल.सर्व पुरुषार्था वरती आधारित आहे.मम्मा बाबाच्या हृदयासीन बनायचे आहे,तर पूर्ण रीतीने अनुकरण करा. हृदयासिन बनण्यासाठी त्यांच्या श्रीमता नुसार चाला.दुसऱ्यांना पण आपल्यासारखे बनवा.बाबा अनेक प्रकारचे युक्ती सांगत राहतात.एका बैज वरती तुम्ही कोणालाही चांगल्या रीतीने समजावू शकता.पुरुषोत्तम महिना असतो तर,बाबा म्हणतात चित्र मोफत देऊ शकता.बाबा भेट देतात.पैसे हातामध्ये येतील तर जरूर समजतील बाबांचा पण खर्च होतो ना,तर लवकर पाठवतील.घर तर एकच आहे ना.या ट्रान्सलाइट च्या चित्रांची प्रदर्शने बनवली तर खूप पाहण्यासाठी येतील.पुण्यांचे काम आहे ना.मनुष्य काट्या पासून फुलं पापा पासून पुण्यात्मा बनतात.यालाच विहंग मार्ग म्हटले जाते.प्रदर्शनीमध्ये स्टॉल घेण्यामुळे खूप येतात,खर्च कमी होतो.तुम्ही इथे आलेले आहात बाबा

पासून सर्गाची राजाई खरेदी करण्यासाठी.तर प्रदर्शनी मध्ये पण येतील,स्वर्गाची राजाही खरेदी करण्यासाठी.हे दुकान आहे ना.

बाबा म्हणतात या ज्ञानाद्वारे तुम्हाला खूप सुख मिळेल,म्हणून चांगल्या रीतीने शिकून पुरुषार्थ करून चांगल्या प्रकारे पास व्हायचे आहे. बाबा आपला आणि रचनेच्या आधी मध्यं अंतचा परिचय देत आहेत.दुसरे कोणी देऊ शकत नाही. आता बाबा द्वारा तुम्ही त्रिकालदर्शी बनतात.बाबा म्हणतात,मी जो आहे जसा आहे,मला तर कोणीही जाणत नाही.तुमच्यामध्ये पण नंबरा नुसार आहेत.जर यर्थात रितीने जाणत असतील तर,कधीच सोडणार नाहीत.हे शिक्षण आहे.स्वयम् भगवान शिकवत आहेत.ते म्हणतात मी तुमचा आज्ञाधारक सेवक आहे.पिता आणि शिक्षक दोन्ही आज्ञाधारक सेवक असतात ना.या अविनाश नाटकांमध्ये माझी भूमिकाच अशी आहे, मी सर्वांना सोबत घेऊन जातो. श्रीमता वर चालुन चांगल्या मार्कांने पास व्हायला पाहिजे. राजयोगाचा अभ्यास तर खूपच सहज आहे.सर्वात वृद्ध तर हे ब्रह्म आहेत. शिव बाबा म्हणतात मी वृद्ध नाही. आत्मा कधीच वृद्ध होत नाही.बाकी पत्थर बुद्धी बनते.माझी तर पारस बुद्धी आहे,तेव्हा तर तुम्हाला पारस बुद्धी बनवण्यासाठी येतो.कल्प येतो,अगणित वेळेस तुम्हाला शिकवतो,तरीही तुम्ही विसरता.सत युगामध्ये या ज्ञानाची आवश्यकता राहत नाही.बाबा खूपच चांगल्या रीतीने समजून सांगतात.अशा बाबांना परत सोडचिट्टी देतात,म्हणून म्हटले जाते महान मुर्ख पाहायचा असेल तर येथेच पहा.असे बाबा ज्यांच्या द्वारे स्वर्गाचा वारसा मिळतो,त्यांना पण सोडून देतात.बाबा म्हणतात तुम्ही माझ्या मतावर चालाल,तर अमर लोक मध्ये विश्वाचे महाराजा महाराणी बनाल. हा मृत्युलोक आहे.मुल जाणतात आम्हीच पूज्य देवी देवता होतो,आता आम्ही काय बनलो आहे,पतित भिकारी. आता परत आम्हीच राजकुमार बनणार आहोत.सर्व एकरस पुरुषार्थ तर करू शकत नाहीत,काही निघुन जातात. काही निंदक बनतात,असे निंदक पण खूप आहेत.त्यांच्याशी गोष्टी पण करायला नको,बोलायला पण नको. ज्ञानाच्या गोष्टी शिवाय दुसरे कोणत्या गोष्टी विचारल्या तर समजा,असुरी पणा आहे. संग किनार्याला लावतो आणि कुसंग बुडवतो.ज्ञानामध्ये हुशार आहेत, ते बाबांच्या हृदयावरती चढलेले आहेत, त्यांचा संग करा.ते तुम्हाला ज्ञानाच्या गोड गोड गोष्टी ऐकवतील. अच्छा

गोड गोड फार वर्षानंतर भेटलेल्या सेवाधारी,इमानदार आज्ञाधारक,मुलांना मातपिता, बाप दादाची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक मुलांना,आत्मिक पित्याचा नमस्ते.

**धारणेसाठी मुख्य सारांश:-**

1. (१)जे देह रहित विचित्र आहेत,त्या बाबांशी प्रेम ठेवायचे आहे.कोणत्याही देह धारीच्या नावावर रूपामध्ये बुद्धी लटकावायची नाही.मायाची चापट लागू नये,याची संभाळ करायची आहे.
2. (२) जे ज्ञानाशिवाय दुसऱ्या गोष्ट ऐकवतात,त्यांची सोबत करायची नाही. चांगल्या मार्कांने पास होण्याचा पुरुषार्थ करायचा आहे.काट्यांना फुलासारखे बनवण्याची सेवा करायची आहे.

**वरदान:-** कारण चे निवारण करून चिंता आणि भय पासून मुक्त राहणारे मास्टर सर्वशक्तिमान भव.

वर्तमान काळामध्ये अलप काळाच्या सुखा सोबत चिंता आणि भय या दोन गोष्टी तर आहेतच.जिथे चिंता आहे तिथे आराम मिळू शकत नाही.जिथे भय आहे तेथे शांती मिळू शकत नाही.तर सुखाच्या सोबतच,हे दुखा शांतीचे कारण भी कारण पण आहेच परंतु आम्हा सर्वशक्तीवान च्या खजान्या द्वारे संप्पन मास्टर सर्वशक्तिमान मुलं, दुःखाच्या कारणा चे निवारण करणारे, प्रत्येक समस्याचे समाधान करणारे, समाधान स्वरूप आहात म्हणून चिंता आणि भया पासून मुक्त आहात.कोणती पण समस्या तुमच्यासमोर खेळ करण्यासाठी येते,घाबरवण्या साठी नाही.

**बोधवाक्य:-** आपल्या वृत्तीला श्रेष्ठ बनवा तर आपली प्रवृत्ती स्वतःच श्रेष्ठ होईल.

||| ओम शांती |||

ओम शांती.